E-Paper: www.vidharbhsatyajeet.in

RNI-MAHMAR-2023/88726

दैनिक विदर्भ सत्यजीत

LIVE NEWS

प्रमुख मार्गदर्शक शौकत भाई शेख | मुख्य संपादक :- उध्दव श्रीराम फंगाळ मो.9511446111/9921746611 | कार्यकारी संपादक योगेश सौभागे

बुलढाणा. वर्ष ३ रे ,अंक २१५ वा, वार शनिवार ४ एप्रिल२०२६ पाने ५ किंमत ४ रुपये

# वकील संघाच्यावतीने 'ईद मिलन' उत्साहात संपन्न

## न्यायालयीन कामकाजाच्या धावपळीत सामाजिक सलोखा वृद्धिंगत करण्याचा संकल्प




मेहकर स्थानिक मेहकर वकील संघ आणि सर्व मुस्लिम बांधव वकीलांच्या वतीने दिनांक ०१.०४.२०२६ रोजी मेहकर वकील संघाचे सभागृहात 'ईद मिलन' कार्यक्रमाचे अत्यंत उत्साहात आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून वकील संघाने सामाजिक एकता आणि वकील संघांमधील कौटुंबिक जिव्हाळ्याचे दर्शन घडवून दिले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. जे. जी. निकस उपस्थित होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा न्यायाधीश श्री.सागर मुंगीलवार तसेच दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर श्रीमती गायगोले, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती पाटील व श्रीमती कांबळे तसेच वकील संघाचे अध्यक्ष ॲड. अनिल अडेलकर उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान बोलताना अनेक वक्त्यांनी नमूद केले की, न्यायालय हे केवळ वाद निवारणाचे केंद्र नसून, तिथे काम करणारे विधीज्ञ आणि कर्मचारी हे एका मोठ्या कुटुंबासारखे आहेत. अशा उपक्रमांमुळे कामाचा ताण हलका होऊन परस्परांमधील स्नेह वाढण्यास मदत होते. सर्व धर्मीय विधिज्ञ एकत्र येत साजरी केलेली ही ईद समाजासाठी एकतेचा मोठा संदेश देणारी ठरली. ''असे कार्यक्रम सामाजिक सलोखा आणि राष्ट्रीय एकात्मता मजबूत करण्यासाठी काळाची गरज आहेत,'' असे मत यावेळी वकील संघाचे अध्यक्ष ॲड. अडेलकर यांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे विशेष नियोजन मेहकर वकील संघातील सर्व मुस्लिम वकील बांधवांनी केले होते. त्यांनी उपस्थितांचे स्वागत करून ईदच्या शुभेच्छा दिल्या आणि पारंपरिक शिरखुर्मा व फराळाचे वाटप केले. यावेळी मेहकर वकील संघाचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. केवळ हिंदू-मुस्लिम बांधवच नव्हे, तर न्यायालयीन कर्मचारी,कारकून बांधव आणि पक्षकारांनीही या आनंदात सहभाग नोंदवला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ॲड. दिलशाद कुरेशी, ॲड. रमिज खान, ॲड.सय्यद मोईन, ॲड.जमील कुरेशी, ॲड.शोएब खान, ॲड.निसार शेख, ॲड. झेन, ॲड. रोशन पठाण, ॲड.इजरायल कुरेशी, ॲड.वसीम शेख, ॲड.आलियार शेख,ॲड. अकरम कुरेशी व ॲड.शहजाद खान ह्यांनीविशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड. रमीज खान तर सूत्रसंचलन ॲड.संजय नवघरे यांनी केले. आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.





> एकमेकांच्या श्रद्धांचा सन्मान करणे हेच खऱ्या अर्थाने सुसंस्कृत समाजाचे लक्षण आहे. आयोजकांनी आयोजिलेल्या या कार्यक्रमाचे विशेष कौतुक व शुभेच्छा.
>
> **–श्री.सागर मुंगीलवार**
> **अती.जिल्हा व सत्र न्यायाधीश**
> **मेहकर**

# मातोश्री विद्यालय महागावच्या दोन संघांची राज्यस्तरावर झेप




महागाव यवतमाळ शालेय शिक्षण विभाग व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन द्वारा आयोजित विभाग स्तरीय वयोगट १७ ११ च्या थ्रो बॉल संघात मुली मुलांच्या संघाने आपली खेळ कौशल्य प्रदर्शित करून विभागीय सामन्यात आपले स्थान पक्के केले राज्यस्तरावर आपली छाप पाडली. या खेळामध्ये खेळाडू ओम गावंडे कर्णधार वयोगट सतरा वर्षे कृष्णा वळसे, साहिल खोसे, रुद्रवीर राऊत, शिवा नेवारे, श्रीकृष्ण गावंडे, गौरव आखाडकर, गौरव गावंडे, सोहम पतके, पवन राऊत, सोहम राऊत, रोहित वानखेडे, या संघाने कार्य कुशलता व चेंडूची झेल अतिशय चुरशीने प्रदर्शित करून राज्यस्तरावर आपली झेप कायम केली . ११ वर्षे वयोगट संघाची कर्णधार म्हणून पल्लवी पहुरकर, प्रगती पहुरकर, जान्हवी नरवाडे, साक्षी कदम ,रोहिणी कदम, सानिका राऊत, उन्नती घोडे ,रोशनी घोडे, तेजस्विनी चव्हाण ,प्रशांती नरवाडे, समृद्धी कदम ,श्रुतिका येनकर यांचा समावेश होता या संघाची वाशिम अमरावती अकोला या संघाचा बॉल अचूक झेल करून आपल्या धुरंधर खेळाने यश संपादन केले व आपली राज्यस्तरासाठी निवड निश्चित केली. संघाचे सर्वत्र कौतुक होत असून खेळाडूंचे संस्थेच्या वतीने व कर्मचारी वृंदाच्या वतीने स्वागत करण्यात आले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.



# राहेरी पुलाला पुर्णत्वास मुहर्त लागेल काय ?




सिंदखेड राजा जालना पुलगाव हायवे ७ ५ ३ सी या मार्गावरील राहेरी पुलाचे काम गेल्या कितेक वर्षा पासुन ठप्प पडला मुळे वहन धारकांना अतिशय त्रासदायक ठरत आहे हा महामार्ग अमरावती विभागाच्या अखत्यारीत असुन संबंधीत यंत्रनेची निष्क्रीयता समोर येत आहे पुलावर एक्सस्पा शंन जाईंट टाकुन पुर्ण झाले मात्र डांबर टाकण्याचे काम अजुन पुर्ण झाले नाही याचे आद्याप कारण पुढे येण्यास तयार नाही पुलाचे काम पुर्णत्वास न गेल्या मुळे वहान धारकाना पर्यायी पुलावरून जावे लागत आहे परंतु पर्यायी झालेला रस्त्यावरून जाताना सर्वच वहान धारकांना मोठ मोठे खड्डे या वरून जाताना खुप त्रास होत आहे त्यातच जर एखादे वहानामधे जर अचानक बिघाड झाली तर वहातुकीस खोळंबा होवून या रस्यावर ड्राफीक जम होते अशा विविध समस्याना वहान धारकाना तोंड द्यावे लागत आहे तरी पावसाळ्या पुर्वि सदर पुलाचे काम पुर्ण होण्याची अत्यंत गरज निर्माण झाली आहे त्यामुळे संबधीत खाते संबधीत ठेकेदार यांनी या कडे लवकरात लवकर लक्ष घालून हे काम पुर्ण करावे अशी मागणी परीसरा मधील जनता व लहान मोठे वहान धारक यांचे कडुन होत आहे



# श्री.क्षेत्र गुरुकुंज मोझरी येथील कार्यशाळा प्रचारका साठी ठरली प्रेरणादायी .




कारंजा लाड:अखिल भारतीय श्री.गुरुदेव सेवा मंडळ श्री.क्षेत्र गुरुकुंज आश्रम अंतर्गत केंद्रीय प्रचार विभागद्वारे दि.२८व २९मार्च रोजी दोन दिवसीय प्रचारशाळा गुरुकुंज आश्रम येथे घेण्यात आली . कार्यशाळेमध्ये प्रचारकांचे व्यक्तिमत्व व कार्य दृष्टी, प्रचारकांची अध्यात्मिक व सामाजिक बांधिलकी, शाखा विस्तार नियोजन व संघटनात्मक बांधणी,सेवा मंडळात महिलांची भूमिका, ग्राम व राष्ट्रनिर्मिती साठी प्रचारकांची भूमिका,प्रचार कार्यात आधुनिक प्रचार माध्यमांचा वापर, सामुदायिक ध्यान व प्रार्थना उपासनेतील एकसुत्रता, उपासनेची फलश्रुती अशा अनेक विषयावर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी सर्वाधिकारी प्रकाश वाघ, पद्मश्री जनार्दन बोथेगुरुजी, आजीवन प्रचारक लक्ष्मणराव काळे,ॲड दिलीप कोहळे, प्रचार प्रमुख गोपाल कडू,कृषीभूषण पौर्णिमाताई सवाई,प्राध्यापक सुभाष लाहे,अमोल बांबल, निलेश गावंडे इत्यादी वक्त्यांनी मार्गदर्शन केले.सकाळी ध्यान तर संध्याकाळी सामूहीक प्रार्थना करण्यात आली.दोन दिवस चाललेल्या या शिबिरात राज्यातील प्रचारक व पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला.या शिबिरामध्ये वाशिम जिल्ह्यातील जिल्हा सेवाधिकारी सुनील दशमुखे प्रसिद्धी प्रमुख विजय खंडार महिला सेवाधिकारी सौ.ज्योतीताई उगले,जिल्हा प्रचारक सौ.हर्षाताई अंधारे,महिला तालुका सेवाधिकारी,सौ.आशाताई व्यवहारे, मानोरा तालुका महिला सेवाधिकारी सौ.सोनूताई म्हातारमारे,यमुनाबाई राठोड,रामबकस डेडुळे, संतोषदादा केळकर,लोमेश चौधरी,आशा भीवरकर,इंदुताई राजुरकर,मंगलाताई धवक, नलिनी राजेधर,परमेश्वर व्यवहारे,यांनी दोन दिवसीय शिबिर यशस्वीपणे पूर्ण केले.या प्रशिक्षणामुळे गुरुदेव सेवा मंडळाच्या प्रचारकांना ऊर्जा मिळाली असून हे प्रशिक्षण उपयुक्त आणि प्रेरणादायी ठरणार असल्याचे मत जिल्हा सेवाअधिकारी सुनील दशमुखे व ज्योतीताई उगले यांनी व्यक्त केले.



# भीमा रमा




संध्या रायठक धूतडे
शिक्षिका नांदेड

साथ भीमा रमाची
राहिली अतूट अशी
दूर असूनही बघा
पत्रांत रमली जशी...

शिकवले रमाईला
लिहायला वाचायला
आठवणींची पाखरे
शब्दांत भिजायला...

पत्रव्यवहार त्यांचे
नेहमी असे राहिले
रमाई भीमरायात
भीम रमाईत वाहिले...

होते असे भीमा रमा
म्हणून झाला उद्धार
बंद सुखद स्वप्नांचे
उघडले त्यांनी दार...

©  संध्या रायठक / धुतडे
(शिक्षिका), नांदेड



# स्व . सौ . कृष्णाताई नामदेवराव खराटे यांचे स्मृती प्रीत्यर्थ

## श्रीपंचवटी हनुमान संस्थान दत्त कॉलनी कारंजा येथे आ . सईताई प्रकाश डहाके यांचे हस्ते

# मंदीर प्रवेश द्वाराचे लोकार्पन संपन्न .




कारंजा लाड:श्री पंचवटी हनुमान संस्थान दत्त कॉलनी कारंजा येथे दि.३० मार्च रोजी स्व सौ .कृष्णाताई नामदेवराव खराटे यांचे स्मृती प्रीत्यर्थ मंदीर प्रवेश द्वाराचे लोकार्पन कारंजा मानोरा मतदार संघाच्या लोकप्रीय आमदार श्रीमती सईताई प्रकाश डहाके यांचे हस्ते खराटे परीवाराचे उपस्थीत पार पडले . प्रथम आमदार श्रीमती सईताई प्रकाश डहाके यांनी नामदेवराव खराटे परीवार व दत्त कॉलनी; महाविर कॉलनी वासीयांच्या उपस्थीतीत मंदीर प्रवेश द्वाराचे लोकार्पन फीत कापून केले याप्रसंगी त्यांनी शक्तीस्थळ असलेल्या बजरंगबलीचे दर्शन घेतले . या छोटेखानी कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी नामदेवराव खराटे गुरुजी तर उदघाटक आमदार श्रीमती सईताई डहाके होत्या . नगर पालीकेच्या भाजपा गटनेत्या सौ शालीनीताई ठाकरे ; नगरसेवक सौ वैशाली गुल्हाने; सौ ज्योती राठोड; सच्चीतानंद सद्यानी;सागरभाऊ अंभोरे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थीती होती . उपस्थीत मान्यवरांचे कॉलनीवासीयां तर्फे स्वागत करण्यात आले . यावेळी आमदार श्रीमती सईताई डहाके यांनी देणगीदाता नामदेवराव खराटे गुरुजी यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला . खराटे परीवाराने मंदीर प्रवेशद्वार समर्पीत केल्या बाबत आमदार श्रीमती सईताई डहाके यांनी खराटे परीवाराबाबत गौरव उदगार काढले. खराटे परीवारासह कॉलनीवासीयांनी प्रकाश दादावर निस्सीम प्रेम केले याचा पुनरोच्चारआमदार श्रीमती सईताई यांनीआपल्या मनोगतातून व्यक्त केला . नामदेवराव खराटे गुरुजींनी आमदार श्रीमती सईताई यांचे हस्ते प्रवेश द्वाराचे लोकार्पन झाल्याबाबत आनंद व्यक्त केला व माझी संकल्प पूर्ती झाल्याचे समाधान त्यांनी मनोगतातून व्यक्त केले . कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा . सुधीर लूंगे सर यांनी केले . कार्यक्रमाचे बहारदार संचलन मोडक सर यांनी तर आभार प्रदर्शन सतीष खराटे यांनी केले . कार्यक्रमाची सांगता उपस्थितांना थंड पेय शरबत देऊन झाली .याच वेळी दत्तकॉलनी ;महाविर कॉलनीतील रोडचे सुद्धा लोकार्पन आमदार श्रीमती डहाके यांनी केले . कदम बाप्पू यांचे कडे सौ .भावनाताई कदम यांच्या अपघाती निधनामुळे सांत्वनापर भेट दिली . यावेळी दत्त कॉलनीचे अध्यक्ष ऍड अरुण खंडागळे; प्रवीण कानकीरड; प्रमोद ठाकरे साहेब; रामचंद्र घुले साहेब अशोक देशमुख; अशोक फुके; शासकीय कंत्राटदार अजय वानखडे; प्रा सुधीर लुंगे ; भरत बापू देशमुख इत्यादींनी आ . श्रीमती सईताई यांना घडलेल्या प्रसंगाबाबत अवगत केले .





# पिंपळगाव बसवंत येथे भव्य सत्संग व पालखी सोहळा संपन्न




नाशिक निष्काम कर्मयोगी शिवयोगी जगतगुरु जनार्दन स्वामी (मौनगिरीजी) महाराज यांचे उत्तराधिकारी,अनंत श्री विभूषित जगतगुरू शांतीगिरीजी महाराज यांच्या पावन उपस्थितीत श्री जनेश्वर महादेव मंदिराचा १२ वा वर्धापन दिनप्रसंगी भव्य सत्संग सोहळा मोठ्या थाटात साजरा झाला.या मंगलमयी प्रसंगी पिंपळगाव नगरीत भव्य श्री बाबाजींची पालखी मिरवणूक संपन्न झाली. ढोल-ताशांच्या गजरात आणि 'जय बाबाजी'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.भक्तीच्या रंगात न्हाऊन निघालेली भव्य पालखी आणि भाविकांचा उत्साह पाहायला मिळाला.प.पू. महात्माजींनी प्रवचनातून उपस्थितांना मार्गदर्शन करत जीवनाचे सार्थक्य कसे करावे,याचे अनमोल विचार मांडले. या सोहळयाला निफाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार दिलीपराव बनकर,पिंपळगाव बसवंतचे नगराध्यक्ष डॉ.मनोज बर्डे, आश्रमीय संत आणि विविध मान्यवरांनी उपस्थित राहून बाबाजींचे दर्शन घेतले.परिसरातील हजारो भाविकांनी या सत्संग सोहळयाचा लाभ घेतला.धार्मिक परंपरेचा वारसा जपणारा आणि सामाजिक ऐक्याचे दर्शन घडवणारा हा सोहळा पिंपळगाव बसवंतच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी कोरला गेला आहे. जय बाबाजी भक्त परिवार व ग्रामस्थांनी सुंदर असे नियोजन केले होते.





# शहापूर तालुक्यातीलगरेलपाडा शाळेची परसबाग स्पर्धेत दुहेरी कामगिरी




शहापूर अघई केंद्रातील जिल्हा परिषद शाळा गरेलपाडा यांनी शालेय परसबाग स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या स्पर्धेत शाळेला तालुका स्तरावर प्रथम क्रमांक तर ठाणे जिल्हा स्तरावर तृतीय क्रमांक मिळाला आहे.या यशामागे मुख्याध्यापक मा. दखणे सर, सहशिक्षक मा. रविंद्र डगळे सर, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य, पालक व विद्यार्थ्यांचे मोलाचे योगदान लाभले. तसेच प्रगती टीम व फील्ड वर्क स्टुडंट्स यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे ही कामगिरी शक्य झाली.या उपक्रमासाठी अघई केंद्राचे केंद्रप्रमुख सन्माननीय श्री. बांगर साहेब, बीट विस्तार अधिकारी श्री. शिंदे साहेब, शहापूर तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी श्री. वेखंडे साहेब तसेच प्रगती प्रकल्प संचालिका व उपसंचालिका मॅडम यांचे मार्गदर्शन लाभले.प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत राबविण्यात आलेल्या परसबाग उपक्रमातील या यशाबद्दल सर्व स्तरांतून शाळेचे अभिनंदन होत असून, पुरस्कार वितरण समारंभ लवकरच आयोजित करण्यात येणार आहे.



# हनुमान जयंती साजरी




सिंदखेड राजा किनगाव राजा येथील विठ्ठल रुखमनी मंदीरा जवळील हनुमान मंदीरा मधे दिनांक २ एप्रील गुरुवार रोजी सकाळी हनुमान जयंती साजरी करण्यात आली या वेळी मुर्तीस अभिषेक केल्या नंतर सामुहीक हनुमान चालीसाचे पठण करण्यात आले या वेळी नुतन माध्यमिक विद्यालयाचे माजी प्राचार्य श्री चंद्रकांतजी पाठक सर श्री प्रकाशसेठ जैन श्री जगनाथ चतुर श्री भगवान तरवडे श्री बाळाभाऊ राजोते श्री पांडुरंग पंडीत श्री अभय कुलकर्णी श्री गोपाल राजे जाधव श्री ज्ञाने श राजे जाधव श्री विशाल राजे जाधव अदी उपस्तीत होते



# पैठण शहरात बारा हनुमान मंदिरांचा अभिषेक;

## भक्तीमय वातावरणात हनुमान जयंती उत्साहात साजरी




पैठण : दक्षिण काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पैठण नगरीत चैत्र पौर्णिमेच्या शुभ पर्वावर बुधवारी हनुमान जयंती मोठ्या उत्साहात व भक्तीभावात साजरी करण्यात आली. शहरातील विविध भागांतील बारा हनुमान मंदिरांमध्ये अभिषेक, पूजन व जयघोषाने वातावरण दुमदुमून गेले.नागघाट, रंगारहट्टी घाट, रेणुका देवी गल्ली, बालाजी मंदिर गल्ली, मामा चौक, शिव दिननाथ मठ, नाथ गल्ली, सुतारपार गल्ली, कुंभारवाडा, साळीवाडा, धनगरवाडा, परदेशीपुरा, कहारवाडा, बाहेरील नाथ समाधी मंदिर परिसर, नारळा गल्ली, शिवनगर, इंदिरानगर, नवीन कवासन आणि लक्ष्मी नगर आदी भागांतील हनुमान मंदिरांत पहाटेपासूनच भक्तांची मोठी गर्दी उसळली होती.भक्तांनी गोदावरीत स्नान करून पवित्र जल घेऊन मंदिरात जाऊन मंत्रोच्चारात अभिषेक केला. जल व पुष्पांची उधळण करत ''मारुतीराय की जय''च्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. रंगारहट्टी येथील संकट विमोचन मारुतीची भव्य मिरवणूकही काढण्यात आली.शहरात सुमारे १५ हनुमान मंदिरे असून सर्वत्र अभिषेक व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विविध सामाजिक संस्थांकडून भक्तांना फळांचे वाटप करण्यात आले.पौराणिक मान्यतेनुसार, त्रेतायुगात प्रभू श्रीराम व लक्ष्मण पैठण येथे वास्तव्यास असताना सीता लंकेत असल्याची माहिती हनुमंतांनी येथे येऊन दिल्याची कथा प्रचलित आहे. त्यामुळे पैठणमधील हनुमान जयंतीला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.दरम्यान, गोदावरीचे पवित्र जल घेण्यासाठी गावागावांतून शेकडो कावडधारक पैठणमध्ये दाखल झाले होते. भक्ती, श्रद्धा आणि उत्साहाच्या वातावरणात हनुमान जन्मोत्सव मोठ्या जल्लोषात पार पडला.



# सिन्नर पोलीसांची उल्लेखनिय कामगिरी सराईत चोरट्यास अटक

## चोरीचा मोबाईल व २ मोटारसायकल हस्तगत




नाशिक सिन्नर पोलीस ठाणे हद्दीत मोटर सायकल चोरी व घरफोडी चोरीच्या वाढत्या गुन्हयांबाबत प्रतिबंध होण्यासाठी पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटिल यांनी उघड गुन्हयांचा आढावा घेवुन कारवाई करण्याचे आदेश दिलेले आहेत.त्या अनुषंगाने अपर पोलीस अधिक्षक अदित्य मिरखेलकर नाशिक ग्रामीण,उपविभागीय पोलीस अधिकारी के.के.पाटील यांनी सिन्नर पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी हेमंतकुमार भामरे,पोलीस निरीक्षक, सिन्नर पोलीस ठाणे यांना सुचना दिल्या होत्या.त्यानुसार पोलीस निरीक्षक हेमंतकुमार भामरे यांनी सिन्नर पोलीस ठाणे कडील गुन्हे शोध पथकातील अंमलदार समाधान बोराडे,नितीन डावखर,विनोद टिळे, कृष्णा कोकाटे,प्रशांत सहाणे, आप्पासाहेब काकड यांना नाउघड मोटर सायकल चोरीचे तपास करणेबाबत सुचना दिल्याने त्यानुसार सदर पथकातील अंमलदार मोटर सायकल चोरी व घरफोडी चोरी गुन्हयांचा तपास करीत असतांना पोनि हेमंतकुमार भामरे, सिन्नर पोलीस स्टेशन यांना गुप्त बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगार गोरख बाळु पिंपळे रा.गुरेवाडी ता.सिन्नर हा सिन्नर येथे मोटर सायकल चोरी करण्यासाठी आलेला असुन तो सदया सिन्नर शहरातील सरदवाडी रोड परिसरात आलेला आहे.अशी खात्रीशिर बातमी समजल्याने त्यावरून सदर पथकाने सरदवाडीरोड परीसरात सापळा रचुन संशयीत इसम गोरख बाळु पिंपळे, वय ३५ वर्ष रा.झापवाडी, लोटसशाळेजवळ सिन्नर जि.नाशिक यास ताब्यात घेवुन त्याचेकडेस विचारपुस केली असता त्याचेकडे एक विनाक्रमांकाची प्लॅटीना मोटारसायकल मिळुण आली सदर मोटारसायकल बाबत चौकशी केली असता सदरची मोटारसायकल ही त्याचा भाऊ बाळा पिंपळे याने चोरी करून आणुन दिलेली असलेबाबत सांगितले.यातील आरोपी नामे गोरख बाळु पिंपळे,वय ३५ वर्ष रा. झापवाडी,लोटस शाळेजवळ,सिन्नर जि.नाशिक याच्या कब्जातुन खालील प्रमाणे चोरीची १ मोटर सायकल, १ रेडमी कंपनीचा मोबाईल, गुन्हा करण्यासाठी वापरण्यात आलेली मोटारसायकल असा एकुन ६०,००० रूपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला असुन सिन्नर पोलीस ठाणेस दाखल असलेला प्रमाणे दाखल असलेला चोरीचा १ गुन्हा उघडकीस आलेला आहे. यातील आरोपीतावर दरोडा,जबरी चोरी, घरफोडी चोरी,मोटारसायकल चोरी असे गंभीर गुन्हे दाखल आहे.सदर आरोपीतावर आतापर्यंत खालील प्रमाणे गुन्हे दाखल आहेत. नाशिक ग्रामीण पोलीस अधिक्षक बाळासाहेब पाटील अपर पोलीस अधिक्षक अदित्य मिरखेलकर नाशिक ग्रामीण, उपविभागीय पोलीस अधिकारी के. के.पाटील यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे




सिन्नर पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक हेमंतकुमार भामरे यांचे आदेशान्वये गुन्हे शोध पथकातील पोलीस अंमलदार समाधान बोराडे,नितीन डावखर, विनोद टिळे,कृष्णा कोकाटे, आप्पासाहेब काकड,प्रशांत सहाणे, यांचे पथकाने वरील गुन्हे उघडकीस आणुन कामगीरी केलेली आहे. पुढील तपास पो.हवा हेबांडे हे करत आहे.

# अॅडव्होकेट सौ.भारतीदेवी सोमाणी यांना सेवाव्रती महिला पुरस्कार प्रदान .

## आदिशक्ती श्री. भिलामाता संस्थान कडून दखल.




/ कारंजा लाड: समाजातील सेवाव्रती महिलाची दखल घेऊन त्यांचे धार्मिक,आध्यात्मिक, सांस्कृतिक,मानवतावादी सामाजिक कार्य लक्षात घेता आदिशक्ती श्री भिला माता संस्थान तर्फे आमदार श्रीमती सईताई डहाके यांचे हस्ते दि.३० मार्च रोजी आदीशक्ती महीला पुरस्कार देण्यात आला. संस्थानने आदिशक्ती श्री भिला मातेचे दिवंगत भक्त लोककलावंत स्व.उमेश मधुकरराव कडोळे यांचे स्मृतीप्रित्यर्थ धार्मिक, आध्यात्मिक,सांस्कृतिक सामाजिक क्षेत्रातील महिलां मंडळीचा आदिशक्ती म्हणून गौरव करण्याचे दृष्टीने कार्यक्रमाचे आयोजन होते . कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी माजी नगराध्यक्ष संजय काकडे उदघाटक आमदार श्रीमती सईताई डहाके प्रमुख उपस्थीतीत म.रा. पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमाणी, संस्थान संस्थापक अध्यक्ष देवमन महाराज ;नगर सेविका श्रीमती कुसूमताई अघम पाटील, सौ. चंदाताई कोळकर, सौ.कांचनताई डेंडूळे यांची व्यासपीठावर उपस्थीती होती . सर्वांचे आयोजन समिती कडून स्वागत करण्यात आले . आदिशक्ती राज्यस्तरिय पुरस्कार गुरुदेव सेवा मंडळाच्या पदाधिकारी अॅडव्होकेट भारतीदेवी निलेश सोमाणी यांना आमदार श्रीमती सईताई डहाके यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.कारंजा नगरीतील संत गजानन महाराज महिला भजनी मंडळ,वनदेवी नगर कारंजा ; संत गजान महाराज महिला भजनी मंडळ शिवाजी नगर कारंजा ; नागनाथ महिला भजनी मंडळ वाणीपूरा कारंजा; शारदा महिला भजनी मंडळ मारवाडी पूरा कारंजा ; श्री गुरुदेव दिपस्तंभ महिला भजनी मंडळ शहर पोलीस स्टेशन जवळ कारंजा ; श्री भिला माता महिला भजनी मंडळ कारंजा ; जय कामाक्षा महिला भजनी मंडळ, इंदिरा गांधी नगर कारंजा ; महर्षी वाल्मिकी महिला भजनी मंडळ दिघी इत्यादीच्या १२५ महिलांना,आदिशक्ती पुरस्काराचे शाल, पुष्पगुच्छ,सन्मानचिन्ह, सन्मानपत्र देवून आदिशक्ती म्हणून गौरविण्यात आले.कार्यक्रमाची सांगता महाप्रसादाने झाली . कार्यक्रमाचे प्रास्तावीक गजाननराव साटोटे गुरुजी यांनी केले . सुत्रसंचलन संजय कडाळे तर आभारसंजय मोरे यांनी मानलेत.



# आदिवासी ग्रामीण भागात झटणारा नेता प्रदीप वाघ

## जनसंपर्कातून उभा केला विश्वासाचा पूल.




शहापूर कसारा:आदिवासी व ग्रामीण भागातील विकासासाठी अहोरात्र झटणारे प्रदीप वाघ हे नाव आज सर्वसामान्यांच्या ओळखीचे बनले आहे. गावागावांत जाऊन लोकांच्या सुख-दु:खात सहभागी होणारा हा नेता केवळ राजकारणापुरता मर्यादित न राहता सामाजिक बांधिलकी जपत असल्याचे चित्र सर्वत्र दिसून येते. लग्नसोहळे, वास्तुशांती, उत्तरकार्य, वाढदिवस, तसेच मित्रांच्या भेटीगाठी अशा विविध प्रसंगांमध्ये त्यांची उपस्थिती हमखास असते.प्रदीप वाघ यांची कार्यशैली वेगळी आणि लोकाभिमुख मानली जाते. जणू काही पायाला भिंगरी बांधल्यासारखे ते दररोज अनेक गावांचा दौरा करतात. प्रत्येक ठिकाणी जाऊन ते नागरिकांशी संवाद साधतात, त्यांच्या अडचणी जाणून घेतात आणि त्या सोडवण्यासाठी तत्परतेने प्रयत्न करतात. त्यामुळे त्यांच्या कार्यावर लोकांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे.आदिवासी भागात मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यावर त्यांनी विशेष भर दिला आहे. रस्ते, पाणी, शिक्षण आणि आरोग्य या क्षेत्रांमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. अनेक ठिकाणी त्यांनी स्वत: पुढाकार घेऊन विकासकामे सुरू केली असून, स्थानिकांना त्याचा थेट फायदा होत आहे.फक्त विकासकामेच नव्हे, तर सामाजिक नातेसंबंध जपण्यालाही ते तितकेच महत्त्व देतात. कोणत्याही कुटुंबात आनंदाचा क्षण असो किंवा दु:खाचा प्रसंग, प्रदीप वाघ हे त्या कुटुंबाच्या पाठीशी उभे राहतात. त्यामुळे ते केवळ नेता न राहता लोकांच्या घरातील एक सदस्य बनले आहेत, अशी भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.त्यांच्या या सततच्या जनसंपर्कामुळे अनेक तरुण त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेत आहेत. समाजासाठी काहीतरी करण्याची जिद्द त्यांच्या कार्यातून दिसून येते.



गावपातळीवर नेतृत्व घडवण्याचे कामही ते करत असून, नव्या पिढीला पुढे आणण्यावर त्यांनी भर दिला आहे.सध्या राजकारणात केवळ निवडणुकीपुरते मर्यादित राहणाऱ्या नेत्यांपेक्षा प्रदीप वाघ यांची कार्यपद्धती वेगळी ठरत आहे. लोकांशी सातत्याने संपर्क ठेवत, त्यांच्या जीवनातील प्रत्येक क्षणात सहभागी होण्याचा त्यांचा प्रयत्न त्यांना इतरांपेक्षा वेगळे स्थान मिळवून देतो.एकूणच, आदिवासी व ग्रामीण भागात झटणारा, लोकांच्या भावनांना समजून घेणारा आणि विकासासाठी कटिबद्ध असलेला नेता म्हणून प्रदीप वाघ यांचे नाव पुढे येत आहे. त्यांच्या कार्यामुळे समाजात सकारात्मक बदल घडत असून, भविष्यातही त्यांच्या कार्याची व्याप्ती अधिक वाढेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# मानसिक स्वास्थ्याचे अंतरंग

धावपळीच्या युगात मानसिक आरोग्य जपताना आपल्याला दैनंदिन जीवनात अनेक गोष्टींना सामोरे जावे लागते. एकाग्रता नसली की मनाचा गोंधळ उडतो. म्हणून योग्य दृष्टीने विचार करण्याची क्षमता, संयम, चिकाटी, विचार आणि जिद्द या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या ठरतात.येणारी परिस्थिती कशी हाताळायची, हे ही मानसिक स्वास्थ्य जपताना शिकणे गरजेचे आहे. या सर्व गोष्टींमुळे आपल्या जीवनात आनंद निर्माण होतो. त्यासाठी आपण नेहमी कृतज्ञता व्यक्त करावी. आपल्या नातेसंबंधांबद्दल, कुटुंबाबद्दल, आई-वडील, भाऊ-बहिण, मित्र-मैत्रिणी तसेच आपल्याला जगण्यासाठी आधार देणारी वसुंधरा, हवा, पाणी आणि दैनंदिन जीवनातील आवश्यक गोष्टी यांच्याबद्दल मनापासून कृतज्ञता व्यक्त करायला हवी. कारण यांच्यामुळेच आपल्या जीवनात आनंद आहे.आपण जेव्हा दुसऱ्यासाठी चांगला विचार करतो, तेव्हा त्याचे चांगले फळ आपल्यालाही कधीतरी मिळते; फक्त थोडी वाट बघावी लागते. उदाहरणार्थ, दोन व्यक्तींमध्ये संवाद सुरू असतो. बोलता बोलता त्याचे रूपांतर वादात होते आणि समोरचा व्यक्ती मनाला लागेल असे काही बोलतो. काही वेळा आपण ते इतके मनावर घेतो की, आपले मानसिक स्वास्थ्य बिघडते.पण यात दोष कुणाचा? समोरच्याला बोलू द्या ते त्याचे जीवन आणि त्याचा स्वभाव आहे. मग आपण का ताण घ्यावा? समोरच्याला बदलण्यापेक्षा स्वतःला बदलणे अधिक योग्य आहे. तो व्यक्ती वायफळ बोलून निघून जातो आणि सर्व विसरून आनंदी राहतो; पण आपण मात्र तीच गोष्ट धरून ठेवतो आणि स्वतःच आपला आनंद हिरावून घेतो.म्हणून काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात....सोडून द्यायला शिकामाफ करायला शिकासकारात्मक व्यक्तींच्या सहवासात रहामहत्त्वाचे निर्णय घेताना चिंतन-मनन करा; कारण चुकीचा निर्णय आयुष्य अधिक क्लिष्ट व कठीण करतो.भूतकाळ आठवायचा असेल, तर आनंद देणाऱ्या चांगल्या आठवणी आठवा. मानवी मनच प्रश्न तयार करते आणि त्याची उत्तरेही स्वतःच देते. फक्त चांगले आणि वाईट यातील फरक ओळखता आला पाहिजे.मानवी मन हे गुंतागुंतीचे कोडे आहे. ते अधिक गुंतागुंतीचे न करता सहजपणे कसे सोडवता येईल, याचा विचार करावा. म्हणूनच म्हटले आहे .''पेराल ते उगवेल.'' तुम्ही चांगल्या विचारांची पेरणी केली, तर नक्कीच चांगले फळ मिळेल.अनेकदा माणूस चांगल्या गोष्टी सोडून नकारात्मक गोष्टींकडे जास्त आकर्षित होतो. पण हे आकर्षण चांगले आहे की वाईट, याचे उत्तर स्वतःलाच शोधायचे असते. अशा वेळी तुमचा कल वाईट गोष्टींकडे असतो, तेव्हा तुमचे अंतर्मन तुम्हाला संकेत देत असते. तो आतला आवाज ओळखायला शिका. नकारात्मक विचारांची तीव्रता जास्त असते, पण परिस्थिती सावरून तिला सकारात्मक दिशेने वळवता आले, तर आयुष्य अधिक सोपे आणि आनंदी वाटते. म्हणून परिस्थिती ओळखून योग्य निर्णय घ्या.कधी कधी परिस्थिती माणसाला चुकीच्या मार्गावर नेते; पण जो स्वतःला सावरतो, तोच खऱ्या अर्थाने जिंकतो. प्रत्येक व्यक्तीचे स्वभाव, गुणधर्म आणि आवडीनिवडी वेगवेगळ्या असतात. म्हणूनच म्हटले जाते''व्यक्ती तितक्या प्रवृत्ती.'' प्रत्येक व्यक्ती हा वेगळा (युनिक) असतो. क्लिष्ट गुंतागुंत असते आपले मानवी मन जो हा गुंता सोडवितो त्याला भेटतात आनंदीत क्षणम्हणून आनंदी रहा, आनंद देत रहा आणि आरोग्याची काळजी घ्या. तुम्ही स्वस्थ असाल, तर दैनंदिन जीवनातील प्रत्येक गोष्टीचा मनापासून आनंद घेता येतो. म्हणून आरोग्य जपा.प्रत्येकाच्या मानसिक स्वास्थ्य आणि आनंदासाठी हा लेख सादर समर्पित.

**सोनाली रायपुरे सहारे, गडचिरोली सोनशिल्प**



# शहापूरमध्ये ठाणे जिल्ह्याचे पहिले तारांगण; ५ एप्रिलला उद्घाटन




शहापूर ठाणे जिल्ह्यातील पहिले अत्याधुनिक तारांगण आणि वेधशाळा शहापूर येथे उभारण्यात आले असून, त्याचे उद्घाटन रविवार, दि. ५ एप्रिल रोजी सायंकाळी ५ वाजता खगोल अभ्यासक दा. कृ. सोमण आणि आमदार दौलत दरोडा यांच्या हस्ते होणार आहे. हा प्रकल्प निलेश ठाकूर आणि त्यांचे बंधू गिरीश ठाकूर यांनी उभारला असून, खगोलशास्त्राची आवड जोपासत जनमानसात या विषयाची रुची निर्माण व्हावी, हा त्यामागील मुख्य उद्देश आहे.शहापूर तालुक्यातील साकडबाव येथे सुमारे साडेतीन एकर जागेत हा प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पाचा पत्ता स्पेस ॲस्ट्रोटेनमेंट (), सर्वे नं. ११७/८, साकडबाव, पोकलेवाडी जवळ, जुनोनी-कोथला रोड, साकडबाव, शहापूर असा आहे. येथे ५६ आसन क्षमतेचे अत्याधुनिक तारांगण तयार करण्यात आले असून, मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषांमध्ये अर्धा ते एक तास कालावधीचे खगोलशास्त्रीय शो दाखविण्याची सुविधा उपलब्ध आहे.या प्रकल्पात चार मोठ्या दुर्बिणींसह सुसज्ज वेधशाळा उभारण्यात आली आहे. १६, १४, १० आणि ६ इंच व्यासाच्या आरशांच्या दुर्बिणी कॉंक्रिट पिलर्सवर बसविण्यात आल्या असून, स्वयंचलित छप्पर उघडण्याची आधुनिक सुविधा देण्यात आली आहे. सोलर फिल्टरच्या



सहाय्याने दिवसा सूर्यावरील सौरज्वाला आणि डागांचे निरीक्षण करता येते, तर रात्री गुरू ग्रहाचे उपग्रह, त्यावरील पट्टे, शनी ग्रहाची वलये तसेच विविध दीर्घिका स्पष्टपणे पाहता येतात. काही दुर्बिणी संगणकाशी जोडलेल्या असून त्यातून छायाचित्रण आणि प्रोजेक्टरद्वारे प्रक्षेपणाची सोयही उपलब्ध आहे.खगोलप्रेमींसाठी रात्रभर आकाश निरीक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली असून, राहण्यासाठी स्वतंत्र खोल्या आणि डॉर्मिटरीची व्यवस्था आहे. याशिवाय प्रदर्शन हॉल, सेल्फी पॉइंट्स, मार्गदर्शनासाठी स्वयंसेवक तसेच खाद्यपदार्थांसाठी कॅन्टीनची सोयही करण्यात आली आहे. या प्रकल्पाला भेट देण्यासाठी आगाऊ नोंदणी आवश्यक असून, इच्छुकांनी ७५०६२६६२६६ किंवा ७५०६३२२३२२ या क्रमांकावर संपर्क साधावा.ठाणे जिल्ह्यातील हे पहिले तारांगण असून, विज्ञान आणि खगोलशास्त्राबद्दलची आवड निर्माण करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# अवकाळी पावसाचा वीटभट्ट्यांना फटका; पैठण तालुक्यात लाखोंचे नुकसान




पैठण / तालुक्यातील शेकडो वीटभट्ट्यांवर अवकाळी पावसाचा मोठा फटका बसला असून, या व्यवसायावर उपजीविका करणाऱ्या सुशिक्षित बेरोजगार तरुणांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. नोकरीच्या अभावामुळे अनेक युवकांनी वीटभट्टी व्यवसायाचा मार्ग स्वीकारला होता. मात्र, अचानक आलेल्या पावसामुळे तयार वीटा भिजून निकामी झाल्याने लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचे समोर आले आहे.वीटभट्ट्यांवरील काम अंतिम टप्प्यात असताना अवकाळी पावसाने हजेरी लावल्याने कच्च्या व तयार वीटा दोन्हींचे नुकसान झाले. त्यामुळे या व्यवसायावर



अवलंबून असलेल्या कुटुंबांवर आर्थिक संकट कोसळले आहे.पैठणसह पाटेगाव, चनकवाडी, पारोळा, कुरण पिंपरी, वडवाळी या भागांत मोठ्या प्रमाणात वीटभट्ट्या असून सर्वत्र नुकसानाचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने पंचनामे करून नुकसानग्रस्तांना मदत व भरपाई जाहीर करावी, अशी मागणी व्यावसायिकांकडून होत आहे.

# हनुमान आखाडा उत्सवात रजनीकांत बोरेले यांचा सत्कार; ठाणेदार लहू तावरे यांच्या हस्ते आरती




पांढरकवडा : येथील प्रसिद्ध हनुमान आखाडा वार्ड येथे हनुमान प्रागट्य दिनानिमित्त भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले. शोभायात्रेच्या प्रारंभी व्हिसल ब्लोअर रजनीकांत डालूरामजी बोरेले यांच्या उपस्थितीत पोलीस निरीक्षक लहू तावरे यांच्या हस्ते विधिवत पूजा व आरती करण्यात आली. या प्रसंगी मोठ्या संख्येने नागरिक, पहलवान व युवक उपस्थित होते. यावेळी रजनीकांत बोरेले यांनी हनुमान आखाड्याची परंपरा आणि इतिहास याबाबत माहिती देताना २००४ सालच्या घटनेचा उल्लेख केला. त्यांनी सांगितले की, त्या काळात पोलिसांनी कलम ३७ (१)(अ) अंतर्गत परवानगी नाकारल्यामुळे हनुमान जयंतीची शोभायात्रा थांबवण्यात आली होती. यावेळी पोलिसांशी वाद निर्माण झाला होता. मात्र, धार्मिक उत्साह कायम ठेवत त्यांनी विना परवानगी वाजंत्रीसह शहरातून शोभायात्रा काढली होती. यानंतर त्यांच्यासह इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला. हा खटला अनेक वर्षे न्यायालयात प्रलंबित होता. रजनीकांत बोरेले यांनी स्वतः न्यायालयात आपली बाजू मांडत कायदेशीर लढा दिला. अखेर न्यायालयाने २५ फेब्रुवारी २००९ रोजी त्यांच्यासह सर्व आरोपींना निर्दोष मुक्तता दिली. या निर्णयानंतर पुन्हा हनुमान जयंती शोभायात्रेला नव्याने सुरुवात झाली, असे त्यांनी सांगितले. तसेच युवकांनी नियमित व्यायाम करून शरीर सुदृढ ठेवावे, असे मार्गदर्शनही त्यांनी केले. कार्यक्रमादरम्यान रजनीकांत बोरेले यांचा भीमराव खेडकर (पहलवान) यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याशिवाय नगराध्यक्ष अतीष बोरेले, नगरसेवक अनिल बोरेले, अनिल थोरात, विवस्वान धुर्वे यांसह अनेक मान्यवरांचा शाल व नारळ देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेश अक्केवार यांनी केले. यानंतर विविध वाजंत्री, आकर्षक झांकी आणि फटाक्यांच्या आतषबाजीसह शोभायात्रेला सुरुवात झाली. शहरातील शिबला चौक, इंदिरा चौक, दत्त चौक ते बाजारपेठ या प्रमुख मार्गांवरून काढण्यात आलेल्या शोभायात्रेत हजारो हनुमान भक्त व पहलवान सहभागी झाले होते. जय हनुमान, जय श्रीराम आणि हर हर महादेवच्या जयघोषांनी संपूर्ण परिसर भक्तिमय झाला. शोभायात्रेदरम्यान लाठी-काठी, तलवारबाजी आणि मल्लखांब यांसारख्या कसरतींचे थरारक सादरीकरण करण्यात आले. पोलीस प्रशासनाकडून चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. शहरातील विविध ठिकाणी नागरिकांनी थंड पेये, अल्पोपहार, आईस्क्रीम व मसाला भात देऊन शोभायात्रेचे उत्साहात स्वागत केले. शोभायात्रेचे अध्यक्ष शुभम (बंटी) लक्ष्मीकांत बोरेले होते.



# तहसिलदार दिवटे यांचे कार्य तत्परतेमुळे सकाळी ९ वाजताच नुकसानीची स्पॉट पाहणी




सिंदखेड राजा खास बातमीनिसर्गाचा कोप आणि शेतकऱ्यांचे दुर्दैव यांचा खेळ सुरू असतानाच, सिंदखेडराजा तहसील प्रशासनाने मात्र आपला संवेदनशील आणि कर्तव्यदक्ष चेहरा समोर आणला आहे. १ एप्रिल रोजी कंडारी-भंडारी परिसरात झालेल्या अतिवृष्टी आणि गारपिटीने शेतकऱ्यांच्या स्वप्नांचा चक्काचूर केला. मात्र, या संकटाच्या काळात तहसीलदार अजित दिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाने दाखवलेली तत्परता कौतुकास्पद ठरत आहे. सकाळी नऊ वाजता महसूल विभाग मैदानात नेहमीच शासकीय कामाच्या विलंबावर टीका होत असताना, कंडारी-भंडारी येथे मात्र चित्र वेगळे दिसले. तहसीलदार अजित दिवटे यांनी तातडीने आदेश दिले आणि ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) ज्ञानेश्वर खरात , व महसूल सहाय्यक कर्मचारी,यांनी पहाटे नऊ वाजताच, चिखल तुडवत शेतकऱ्यांच्या बांधावर धाव घेतली. नुकसानीचे भीषण वास्तव प्रत्यक्ष पाहणीदरम्यान निसर्गाच्या तांडवाचे भयावह रूप दिसून आले. चक्रीवादळ आणि गारपिटीमुळे पिकांचे जे नुकसान झाले आहे, ते पाहून उपस्थित शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पाणी आले. पाहणीत खालील प्रमुख पिकांची मोठी हानी झाल्याचे स्पष्ट झाले:टरबूज: काढणीवर आलेली फळे फुटून सडली आहेत.कांदा व गहू: उभे पीक आडवे झाले असून मातीमोल झाले आहे.आंबा बागा: चक्रीवादळामुळे मोठ्या प्रमाणावर फळगळ झाली असून बागायतदारांचे कंबरडे मोडले आहे.शेतकऱ्याचा तोंडी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. अशा कठीण प्रसंगी यांनी तहसीलदाराची दिवटी यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने प्रत्यक्ष पिक पहाणी सुरू केली आहे असे ज्ञानेश्वर खरात (ग्राम महसूल अधिकारी) म्हणाले.शेतकरी संकटात असताना खुर्चीत बसून न राहता, प्रत्यक्ष बांधावर जाऊन सांत्वन करणाऱ्या या अधिकाऱ्यांच्या कार्यतत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे. महसूल विभागाने दाखवलेला हा वेग, पीडित शेतकऱ्यांना दिलासा देणारा ठरला आहे. आता लवकरात लवकर पंचनामे पूर्ण करून शासनाकडून ठोस आर्थिक मदत मिळावी, अशी आर्त हाक कंडारी-भंडारी येथील शेतकरी देत आहेत.



# शेंदुर्जन येथे हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा संपन्न




सिंदखेड राजा विषेष बातमी''परमेश्वराची कृपा आणि भक्तांचे समर्पण जिथे असते, तिथे कोणतीही गोष्ट अशक्य नसते. ईश्वरी अधिष्ठानामुळेच मंदिराचे कार्य निर्विघ्नपणे पूर्ण झाले असून, आज हा मंगल सोहळा साक्षात भक्तीचा महाकुंभ ठरला आहे,'' असे गौरवपूर्ण उद्गार ह.भ.प. स्वामी हरि चैतन्य महाराज यांनी काढले. निमित्त होते, तालुक्यातील शेंदुर्जन येथे आयोजित भव्य कलशारोहण आणि हनुमान मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे.५ मार्च रोजी सुरू झालेल्या या ११ दिवसीय अखंड हरिनाम सप्ताह, ज्ञानेश्वरी पारायण आणि मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळ्याची सांगता २ एप्रिल रोजी अत्यंत उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात झाली. या सोहळयामुळे संपूर्ण परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला होता.राज्याचे माजी मंत्री डॉ. राजेंद्र शिंगणे यांचे महत्त्वपूर्ण प्रतिपादनया सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून राज्याचे माजी मंत्री डॉ. राजेंद्रजी शिंगणे उपस्थित होते. यावेळी भाविकांना संबोधित करताना ते भावनिक झाले. ते म्हणाले की, ''शेंदुर्जन गावाची ओळख आता 'मंदिरांचे गाव' आणि 'वारकऱ्यांचा गड' म्हणून होत आहे. या गावाची आध्यात्मिक वाटचाल खरोखरच कौतुकास्पद आहे. मी या गावचा सुपुत्र असल्यामुळे सामाजिक व धार्मिक कामांसाठी कधीही निधी कमी पडू दिला नाही. गावाच्या विकासासाठी आणि वैयक्तिक स्तरावरही कोणतीही अडचण भासल्यास ती पूर्ण करणे, हे मी माझे कर्तव्य समजतो.'' त्यांच्या या आश्वासक शब्दांमुळे ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.श्याम येऊल यांनी मांडला विकासाचा लेखाजोखासोहळ्याचे प्रास्ताविक करताना श्याम येऊल यांनी डॉ. राजेंद्र शिंगणे यांच्या कार्याचा गौरव केला. ते म्हणाले की, ''हनुमान मंदिराच्या कामासाठी साहेबांनी २० लाख रुपयांचा निधी दिला, असे म्हणणे अपुरे ठरेल; कारण साहेबांनी आजवर शेंदुर्जन गावाच्या सर्वांगीण विकासासाठी कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला आहे.''विकासाची ही परंपरा पुढे नेण्यासाठी त्यांनी ग्रामस्थांच्या वतीने एक महत्त्वाची मागणीही साहेबांकडे मांडली. ''ऊन, वारा आणि पाऊस यांपासून भाविकांचे संरक्षण व्हावे, यासाठी मंदिराजवळ एक भव्य 'समाज मंदिर' (सभामंडप) उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा,'' अशी विनंती त्यांनी केली.स्वामी हरि चैतन्य महाराज यांची आध्यात्मिक शिदोरीकाल्याच्या कीर्तनाचे निरूपण करताना स्वामी हरि चैतन्य महाराज यांनी भक्तीचे महत्त्व विशद केले. ते म्हणाले, ''भक्तीमध्ये तर्काला स्थान नसावे. जोपर्यंत मनुष्याला आत्मबोध होत नाही, तोपर्यंत मनातील संशय जात नाही. ईश्वरी अधिष्ठान आणि भक्तांचे समर्पण यामुळेच हे भव्य मंदिर उभे राहिले आहे.'' 'विठ्ठल पायीं ठेविले डोई' या अभंगाचा संदर्भ देत त्यांनी उपस्थितांना समर्पणाची शिकवण दिली.मान्यवरांचा सत्कार आणि गौरवया मंगल प्रसंगी मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात आला: ✻ डॉ. राजेंद्रजी शिंगणे यांच्या हस्ते स्वामी हरि चैतन्य महाराज यांचा भावपूर्ण सत्कार करण्यात आला. ✻ मंदिर समितीच्या वतीने डॉ. राजेंद्रजी शिंगणे यांचा 'गावचा सुपुत्र' म्हणून विशेष गौरव करण्यात आला. ✻ आध्यात्मिक क्षेत्रातील साध्वी त्रिवेणी दीदी यांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. ✻ मंदिराच्या कामासाठी अहोरात्र परिश्रम घेणारे ग्राम महसूल अधिकारी संजय शिंगणे यांचा जाहीर सत्कार करून त्यांच्या निष्ठेचे कौतुक करण्यात आले.भगवेमय वातावरण आणि भव्य पालखी मिरवणूकसमारोपाच्या दिवशी संपूर्ण शेंदुर्जन नगरी जणू 'वैकुंठ' झाली होती. घराघरासमोर रांगोळ्या, सडा टाकला होता आणि प्रत्येक नागरिक भगव्या पोशाखात दिसत होता. मूर्ती प्राणप्रतिष्ठेनंतर हनुमंताची भव्य पालखी मिरवणूक गावातून काढण्यात आली. दुपारी ४ वाजेपासून महाप्रसादाचे वाटप सुरू झाले, ज्याचा लाभ शेंदुर्जनसह पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी घेतला.११ दिवसांच्या उत्सवाची यशस्वी सांगताहा संपूर्ण सोहळा वैकुंठवासी ह.भ.प. प्रभाकर महाराज शिंगणे यांच्या कृपाशीर्वादाने आणि खुशाल महाराज शिंगणे यांच्या समर्थ नेतृत्वात पार पडला. या कार्यक्रमाला ह.भ.प. प्रकाश बुवा जवंजाळ, गावातील प्रतिष्ठित नागरिक, महिला आणि बालके मोठ्या संख्येने उपस्थित होते. अकरा दिवस चाललेल्या या सोहळ्याने शेंदुर्जनच्या इतिहासात एक सुवर्णपान जोडले आहे.



# श्री व्यंकटेश महाविद्यालयात प्रा. दामोदर दगडे यांना श्रद्धांजली अर्पण




देऊळगाव राजा. स्थानिक श्री व्यंकटेश महाविद्यालयातील सेवानिवृत्त मराठी विभागप्रमुख प्रा. दामोदर दगडे यांचे दिनांक ०२ एप्रिल रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८८ वर्षे होते. महाविद्यालयाचे अध्यक्ष राजे विजयसिंह जाधव, व्यवस्थापन प्रतिनिधी सौ. छायाराजे विजयसिंह जाधव, प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे, मराठी विभागप्रमुख प्रा. मधुकर जाधव यांच्यासह प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वतीने प्रा. दगडे सरांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी विशेषत्वाने उपस्थित असलेले प्रा. दगडे सरांचे माजी विद्यार्थी अशोक जोशी आणि सूरज गुप्ता यांनी त्यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला. महाविद्यालयात कार्यरत असताना प्रा. दगडे यांनी अनेक विद्यार्थी घडवले. क्रीडा व सांस्कृतिक दृष्ट्या महाविद्यालयाला वैभव प्राप्त करून देण्यात त्यांचे महत्वाचे योगदान होते. प्रा. दामोदर दगडे यांच्या निधनाबद्दल पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून संवेदना व्यक्त केल्या आहेत.



# विद्यारंभ स्कूलमध्ये प्री-प्रायमरी ग्रॅज्युएशन डे उत्साहात साजरा




कारंजा लाड:कारंजा लाड येथील विद्यारंभ स्कूलमध्ये प्री-प्रायमरी विद्यार्थ्यांचा ग्रॅज्युएशन डे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाला महेंद्र धनस्कर सर शिक्षक जे.डी.चवरे विद्यामंदिर कारंजा ;शाळेचे अध्यक्ष सुनील झंवर, सचिव सौ. अंजली झंवर, व्यवस्थापक कु. रोशनी तळेकार, समन्वयक श्री. दिनेश फंदे इत्यादींची प्रमुख उपस्थीती होती . दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरवात करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. गाणी, नृत्य, नाटिका आणि आकर्षक पोषाख परिधान केल्याने




कार्यक्रमाला रंगत आली. विद्यार्थ्यांना ग्रॅज्युएशन कॅप परिधान करून प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. लहानग्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि उत्साह पाहण्यासारखा होता. पालकांनीही आपल्या मुलांच्या यशाचा अभिमान व्यक्त केला.मुख्याध्यापकांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा कटिबद्ध असल्याचे सांगितले. शिक्षकांनीही विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने झाला. हा ग्रॅज्युएशन डे विद्यार्थ्यांसाठी अविस्मरणीय ठरला. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन श्रीकांत पवार व रिझवाना नौरंगाबादी यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजन प्रीती असलमोल,पल्लवी गावंडे,धनश्री नायसे यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्याकरिता सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

# देशी दारू बंद करण्यासाठी १६ एप्रिल रोजी मतदान होणार!




महागाव, प्रभाग क्र.१ मधील हरित क्रांतीचे प्रणेते कै. वसंतराव नाईक यांच्या तैलचित्राला लागून वरदळीच्या चौकात देशीदारू विक्रीच्या दुकानाला ना हरकत पत्र देण्यात आले. या प्रभागातील दुकाना लगतचे वाईन बार बंद करण्यासाठी प्रभागातील महिलांनी एल्गार पुकारला आहे. यासंदर्भात मतदान प्रक्रिया ही १६ एप्रिल रोजी घेण्यात येणार आहे, दरम्यान राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून नगरपंचायत प्रशासनाला प्राप्त झालेले पत्र अद्याप गोपनीय ठेवल्याने आंदोलक महिलांनी आश्चर्य व्यक्त करत सदर पत्र अद्याप गोपनीय का ठेवण्यात आले? याचा प्रशासनास जाब विचारला आहे. महिलांचा हा लढा चिरडण्यासाठी काही राजकीय समाजकंटक सक्रिय झाले आहेत. महिलांना आमिष दाखवून आडव्या बाटलीचा हा लढा उधळून लावण्याचे प्रयत्न काही लोकप्रतिनिधी कडून खुलेआम सुरू असण्याची माहिती प्रकाश झोतात येत आहे. प्रशासनातील काही भ्रष्ट प्रवृत्तीचा या देशी दारू दुकानाला पाठिंबा मिळत आहे. देशी दारू दुकान बंद करण्यासाठी प्रभाग एक मधील महिलांचे मतदान घेण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाचे महागाव नगरपंचायत प्रशासनाला मागील पंधरवड्यापूर्वी पत्र प्राप्त झाले झाल्याचे कळते. मात्र हे पत्र गोपनीय ठेवण्याचे कट कारस्थान न.प. प्रशासनाने केल्याचा आरोप जयश्री नरवाडे यांनी केला.पंधरवड्यापूर्वी मतदान प्रक्रिये संदर्भात पत्र प्राप्त झाले. परंतु याबाबत अद्याप गोपनीयता पाळण्यात का आली? याबाबत आंदोलक महिलांमध्ये प्रशासनाच्या विरोधात कमालीचा संताप व्यक्त होत आहे. या मध्ये काही लोकप्रतिनिधीचा पडद्याआडून सहभाग असल्याची उजागर चर्चा सुरू आहे. दारू दुकान बंद करण्याच्या लढ्याचे नेतृत्व करणाऱ्या नगरसेविका जयश्री नरवाडे यांच्या पासून या पत्राची हेतू पुरस्कार माहिती लपवून ठेवण्यात आली. राज्य उत्पादन




शुल्क विभागाकडे जयश्री नरवाडे यांनी यासंदर्भात विचारणा केली असता पंधरवड्या पूर्वीच मतदान प्रक्रिये बाबतचे पत्र नगरपंचायत प्रशासनाकडे पाठविण्यात आल्याची धक्कादायक माहिती समोर आली. एवढ्या संवेदनशील विषयाची माहिती आंदोलनकर्त्या प्रमुख आणि प्रभागातील महिलांना का लपवून ठेवण्यात आली, याबद्दल चर्चांना उधाण आले आहे. प्रभाग १ मधील वसंतराव नाईक साहेबांच्या चित्रालगत सुरू झालेले देशी दारू दुकान आणि शेजारील वाईन बैठक बारच्या विरोधात स्थानिक महिलांनी उभारलेल्या आंदोलनाची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेतली असून बाटली आडवी करण्यासाठी १६ एप्रिल ही तारीख निश्चित करण्यात आली आहे. गुप्त मतदानाद्वारे दारू दुकानाचा अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे. महिलांनी सादर केलेल्या निवेदनातील सह्याची राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून ७ मार्च रोजी सावित्रीबाई फुले विद्यालयात पडताळणी करण्यात आली. एकूण ४२ सह्या वैद्य ठरल्या. त्या एकूण संख्येच्या २५ टक्के व अधिक असल्याने गुप्त मतदान प्रक्रिया राबविण्याचे आदेश जिल्हाधिकारी विकास मीना यांनी दिले. दरम्यान संबंधित आदेश पंधरवड्यापूर्वीच महागाव नगरपंचायत कडे पोहोचला होता परंतु आंदोलन कर्त्या महिलांना पत्रा संबंधी माहिती का दडवण्यात आली असल्याचा आरोप जयश्री नरवाडे यांनी केला होता. त्यानंतर स्थानिक पातळीवर या टाळाटाळीवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाल्यानंतर नगरपंचायत प्रशासनाने अखेर हालचाल करीत मतदानाची तारीख निश्चित केली आहे. प्रभाग एक मधील माजी मुख्यमंत्री कै. वसंतराव नाईक यांच्यातील चित्र लगत असलेले देशी दारू दुकान तसेच बाजूला असलेले बैठक बार बंद करण्यासाठी महिलांची मागणी आहे. ही मतदान प्रक्रिया १६ एप्रिल रोजी सकाळी ८ ते दुपारी २ या वेळेत सावित्रीबाई फुले कन्या शाळेत पार पडेल. त्यानंतर सायंकाळी ४ वाजता मतमोजणी होऊन निकाल जाहीर केल्या जाणार असल्याचे कळते.

# माजी सैनिक संघर्ष समितीची मासिक मिटींग खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न




श्रीरामपूर: श्रीरामपूर तालुक्यातील माजी सैनिक संघर्ष समितीची मासिक मिटींग खेळीमेळीच्या वातावरणात संपन्न झाली. मागील मिटींगचे इतिवृत्त व संघटनेचा जमा खर्च संघटनेचे संस्थापक अध्यक्ष मेजर सुधाकर हरदास यांनी वाचून दाखवला, मिटिंगमध्ये अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले उदा.माजी सैनिक पाल्यांना राज्य व केंद्र शासनाच्या वतीने शैक्षणिक कालावधीत मिळत असलेल्या १) चिल्ड्रन एज्युकेशन अलाउन्स (सी.ई.ए.) आणि शिष्यवृत्ती बाबत वेळेपुर्वी लागु असलेले कागदपत्र जमा करणे,२) सैनिकी सर्व कागदपत्रांमध्ये पत्नीचे मुलांचे व आपले सैनिकांचे संपूर्ण नांव जन्म दिनांकांची नोंद आहे की नाही त्याची शहनिशा करून दुरुस्ती करून घेणे, ३) विधवा पत्नींना ज्या सुविधा लागू आहेत त्या मिळवून देण्यासाठी संघटनेच्या माध्यमातून मदत करणे, ४) नुकतेच दिवंगत झालेल्या माजी सैनिकांच्या पत्नींस फॅमिली पेन्शन मिळणे कामी लागत असलेले सर्व कागदपत्रांबद्दल माहिती देऊन मदत करणे, ५) गेल्या मासिक मिटींगमधे ठरल्याप्रमाणे ज्या माजी सैनिकांचे वाढदिवस आहेत त्यांचे त्रैयमासिक वाढदिवस येथून पुढे नितनियमाने संघटनेच्या माजी सैनिकांच्या परिवारासमवेत साजरे करणे, त्याप्रमाणे काळे लॉन येथे सर्व माजी सैनिक व त्यांच्या परिवारातील सदस्यांच्या समवेत माजी सैनिक चंदू बडाख, मंगेश यादव , सुनील गवळी , विलास खर्डे , रवींद्र कुलकर्णी, रामधन बिलवाल, व संतोष गोरे यांचा माजी सैनिक संघटनेच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला व भोजनासह मोठ्या उत्साहात वाढदिवस साजरा करण्यात आला.याबरोबरच या मिटिंगमध्ये अतिशय महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला तो म्हणजे माजी सैनिक महिला बचत गटाची स्थापना करण्यात आली तसेच पदाधिकारी निवड अध्यक्षा- श्रीमती सुवर्णा दत्तात्रय दरेकर , सचिव- वैशाली बद्रीनाथ देशमुख व खजिनदार- सौ.गितांजली रवींद्र कुलकर्णी या नवीन बचत गटाला (विरांगणा) महिला बचत गट असे नांव देण्यात आले, बचत गटाचे फायदे , तोटे, मिळणारे केंद्र व राज्य तसेच जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांच्याकडून मिळत असलेल्या अनुदानाबाबत मेजर कृष्णा सरदार यांनी इतंभूत माहिती दिली. याप्रसंगी संघटनेचे माजी सैनिक आपल्या परिवारातील सर्व सदस्यांसमवेत मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेजर कृष्णा सरदार यांनी केले तर आभार प्रदर्शन मेजर बाळासाहेब भागडे यांची कन्या कु.प्रतिक्षा हिने केले.

